# F.Y.B.A

## SEM – I TOPIC - 2

## भारतातील शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र

## (Agriculture, Industry and Service Sector in India)

२.१ अर्थव्यवस्थेची क्षेत्रीय संरचना

२.२ भारताच्या आर्थिक विकासातील योगदान शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र

२.३ भारतातील स्थूल देशांतर्गत उत्पादन आणि रोजगाराचे क्षेत्रीय वितरण

२.४ शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र यांच्यातील परस्परावलंबन

### २.० प्रास्ताविक (Introduction):

अर्थव्यवस्थेचे विविध क्षेत्रांमध्ये विभाजन केल्याने त्या क्षेत्रातील आर्थिक व्यवहारांचे विश्लेषण करण्यात मदत होते. आर्थिक क्षेत्रांचे प्राथमिक क्षेत्र, दुय्यम क्षेत्र आणि तृतीयक क्षेत्र या तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते. भारताच्या आर्थिक विकासात शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र परस्परांवर अवलंबून आहेत. भारतात शेती क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण जास्त आणि उद्योग क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण कमी आहे. शेती क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण कमी होण्याची आणि उद्योग क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण वाढण्याची गरज आहे.

प्रस्तुत प्रकरणात अर्थव्यवस्थेची क्षेत्रीय संरचना, भारताच्या आर्थिक विकासातील शेती, उद्योग व सेवा क्षेत्र यांचे योगदान, भारतातील स्थूल देशांतर्गत उत्पादन व रोजगाराचे क्षेत्रीय वितरण आणि शेती, उद्योग व सेवा क्षेत्र यांच्यातील परस्परावलंबन याविषयी स्पष्टीकरण दिले आहे.

### २.१ अर्थव्यवस्थेची क्षेत्रीय संरचना :

(Sectoral Structure of an Economy)

अर्थव्यवस्थेचे विविध क्षेत्रांमध्ये विभाजन केल्याने त्या क्षेत्रातील आर्थिक व्यवहारांचे विश्लेषण करण्यात मदत होते परिणामी, क्षेत्र विश्लेषण अर्थव्यवस्थेचा विस्तार होत आहे की नाही किंवा अर्थव्यवस्थेचे क्षेत्र आकुंचन अनुभवण आहे की नाही याचे संकेत देते. ग्राहक आणि व्यवसायांच्या आर्थिक व्यवहारांचे वर्गीकरण व्यवसाय व्यवहारांच्या प्रकारावर आधारित गटांमध्ये करण्यासाठी क्षेत्रांचा वापर केला जातो, देशाच्या अर्थव्यवस्थेतील विशिष्ट क्षेत्र हा विशिष्ट प्रकारच्या उद्योगाशी जोडलेला भाग असतो. आर्थिक क्षेत्र हे समान वैशिष्ट्यांसह व्यवसायांनी बनलेले अर्थव्यवस्थेचे क्षेत्र आहे. समान व्यावसायिक व्यवहारांमध्ये गुंतलेल्या कंपन्यांचे गट करून आर्थिक व्यवहारांचे वर्गीकरण करण्यासाठी क्षेत्रांचा वापर केला जातो. उदाहरणार्थ, काही क्षेत्र अशा व्यवहारांमध्ये गुंतलेले आहेत ज्यात उत्पादन चक्राच्या सुरुवातीच्या टप्प्यांचा समावेश आहे, जसे की कच्चा माल निष्कर्षण किंवा काढणे, काही क्षेत्रांमध्ये त्या कच्च्या मालाचा वापर करून वस्तूंचे उत्पादन करणे समाविष्ट आहे. तर काही कंपन्या सेवा कार्यात व्यस्त आहेत. आर्थिक क्षेत्रांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१) प्राथमिक क्षेत्र (Primary Sector):

प्राथमिक क्षेत्र हे असे क्षेत्र आहे जे मुख्यत्वे वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी आणि विविध प्रक्रिया राबविण्यासाठी नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. दैनंदिन कामकाज चालू ठेवण्यासाठी या क्षेत्रातील सेवा पूर्णपणे नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धतेवर अवलंबून असतात. अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक क्षेत्रात, नैसर्गिक संसाधनांचा प्रत्यक्ष वापर करून उपक्रम राबवले जातात. शेती, खाणकाम, मासेमारी, वनीकरण, दुग्धव्यवसाय इ. ही या क्षेत्राची काही उदाहरणे आहेत. त्याला प्राथमिक क्षेत्र असे म्हटले जाते कारण ते इतर सर्व उत्पादनांसाठी आधार बनते. अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्राचा उत्पादनाच्या निमित्ताने पर्यावरणाशी प्रत्यक्ष संवाद असतो. प्राथमिक क्षेत्राची उदाहरणे म्हणजे शेती, खाणकाम आणि मासेमारी. प्राथमिक क्षेत्राचे महत्त्व मूलभूत अन्न व कच्चा माल मिळविण्यासाठी उत्पादनांचे पीक किंवा पर्यावरणातून निष्कर्षण किंवा काढण्याशी (extraction) संबंधित आहे. नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करणे हा प्राथमिक क्षेत्राचा अंतिम उद्देश आहे. आपल्याला मिळणारी बहुतांश नैसर्गिक उत्पादने ही शेती, दुग्धव्यवसाय, वनीकरण, मासेमारी यातून मिळत असल्याने त्याला कृषी व संलग्न क्षेत्र असेही म्हणतात. प्राथमिक क्षेत्रातील कंपन्या खाणकाम आणि कृषी यांसारख्या नैसर्गिक संसाधनांचा वापर करणाऱ्या व्यवहारांमध्ये थेट गुंतलेल्या आहेत.

२) दुय्यम क्षेत्र (Secondary Sector):

दुय्यम क्षेत्रात प्राथमिक क्षेत्रात उत्पादित नैसर्गिक साहित्यापासून तयार उत्पादने बनविणाऱ्या उद्योगांचा समावेश होतो. औद्योगिक उत्पादन, सुती कापड, साखर उत्पादन इत्यादी उपक्रम या क्षेत्रांतर्गत येतात. त्यामुळे कच्च्या मालाचे उत्पादन करण्याऐवजी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा हा भाग आहे. हे क्षेत्र विविध प्रकारच्या उद्योगांशी संबंधित असल्याने त्याला औद्योगिक क्षेत्र देखील म्हणतात. वीज, पोलाद, रिफायनरी उत्पादने, कच्चे तेल, साखर, सिमेंट, नैसर्गिक वायू आणि खते हे काही प्रमुख उद्योग आहेत. अर्थव्यवस्थेच्या दुय्यम क्षेत्रात, कच्चा माल उपभोग किंवा विक्रीसाठी योग्य अशा वस्तूंमध्ये किंवा उत्पादनांमध्ये रूपांतरित केला जातो. दुय्यम क्षेत्र देशाला कृषी किंवा इतर तत्सम व्यवहारांमधून विकसनशील बाजाराकडे जाण्यास मदत करते. दुय्यम क्षेत्रात वस्तुनिर्माण वगैरे उत्पादन व्यवहारांचा समावेश होतो वस्तुनिर्माण याचा अर्थ : कारखाना आणि उद्योग या उत्पादन युनिट्समध्ये कच्चा माल वापरून वस्तूंचे उत्पादन होय.  दुय्यम क्षेत्रामध्ये अशा व्यवहारांचा समावेश होतो ज्यामध्ये औद्योगिक व्यवहारांशी संबंधित उत्पादनाच्या मागि नैसर्गिक उत्पादने इतर स्वरूपात बदलली जातात. प्राथमिक नंतरची ही पुढची पायरी आहे. वस्तू ही निसगनि तवर केलेली नसून ती बनवावी लागते आणि त्यामुळे उत्पादनाची काही प्रक्रिया आवश्यक असते. ती कारखान्यात, कार्यशाळेत किंवा घरी असू शकते. उदाहरणार्थ, कापसापासून सूत आणि त्यापासून कापड तयार केले जाते उसाचा कच्चा माल म्हणून बापर करून साखर किंवा गुळाचे उत्पादन केले जाते.

३) तृतीयक क्षेत्र (Tertiary Sector):

प्राथमिक आणि दुय्यम नंतर, व्यवहारांचा तिसरा प्रकार आहे जो तृतीयक क्षेत्र अंतर्गत येतो आणि तो वरील दोनपेक्षा वेगळा आहे. हे असे उपक्रम आहेत जे प्राथमिक व दुय्यम क्षेत्राच्या विकासास मदत करतात. हे व्यवहार स्वतःहून बस्तू उत्पादन करत नाहीत परंतु ते उत्पादन प्रक्रियेसाठी मदत किंवा आधार देतात. वाहतूक, साठवण, दळणवळण, बैंकिंग, व्यापार ही तृतीयक व्यवहारांची काही उदाहरणे आहेत. या उपक्रमांतून वस्तूंऐवजी सेवा निर्माण होत असल्याने तृतीयक क्षेत्राला सेवा क्षेत्र असेही म्हणतात. सेवा क्षेत्रामध्ये काही अत्यावश्यक सेवा देखील समाविष्ट आहेत.

विविध मूलभूत अत्यावश्यक सेवांमध्ये वेगवान तांत्रिक विकासामुळे तृतीयक क्षेत्राचे महत्त्व वाढत आहे. वा मूलभूत सेवांमध्ये आरोग्यसेवा, बँकिंग वगैरेंचा समावेश आहे. तृतीयक क्षेत्राचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे त्यात व्यवसायांसाठी प्रवेशाचा कमी अडथळा आहे. तृतीयक क्षेत्रात ग्राहकांना आणि व्यवसायांना सेवा पुरवणे समाविष्ट आहे. तृतीयक क्षेत्रातील उपक्रम प्राथमिक आणि दुय्यम क्षेत्राच्या विकासासाठी मदत करतात.

२.२ भारताच्या आर्थिक विकासातील योगदान: शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र :

(Contribution in Economic Development of India: Agriculture, Industry and Service Sector)

भारताच्या आर्थिक विकासात शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र पुढीलप्रमाणे महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

### २.२.१ शेती क्षेत्र :

भारतातील शेती क्षेत्र पुढील विविध मार्गांनी देशाच्या आर्थिक विकासात योगदान देत आहे.

१) राष्ट्रीय उत्पन्नात सहभाग :

आर्थिक बिकास होत असताना देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. भारतातील शेती क्षेत्र देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात भर टाकुन आर्थिक विकास प्रक्रियेत योगदान देत आहे. भारताच्या स्थूल मूल्यवृद्धितील शेती क्षेत्राचा हिस्सा २०२१-२२ मध्ये १५.६ टक्के होता.

२) कच्च्या मालाचा पुरवठा :

भारतातील शेती क्षेत्र उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणाच्या अनेक उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा करते. साखर उद्योग, कापड उद्योग बासारखे अनेक उद्योग कच्च्या मालासाठी शेतीवर अवलंबून आहेत. ऊस, कापूस, तेलबिया, धान्ये, कडधान्ये वगैरे कच्च्या मालाचा पुरवठा करून भारतातील शेती क्षेत्र उद्योगांच्या प्रगतीत व त्यातून देशाच्या विकासात योगदान देत आहे.

३) रोजगारात मोठा हिस्सा :

भारतातील एकूण रोजगारातील शेती क्षेत्राचे प्रमाण २०१९-२० मध्ये ४५.६ टक्के टक्के होते. उद्योग व सेवा क्षेत्राच्या तुलनेत शेती क्षेत्रातील रोजगाराचे किंवा कार्यरत कामगारांचे प्रमाण जास्त आहे. एकूण ग्रामीण रोजगारातील शेती क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण ६१.५ टक्के होते.

४) निर्यातीत महत्त्वपूर्ण सहभाग :

भारतातील शेती क्षेत्राचा निर्यातीतील वाटा महत्त्वपूर्ण आहे. शेती क्षेत्रातील विविध उत्पादनांची वेगवेगळ्या देशांना निर्यात केली जात आहे. आयातीसाठी लागणारे परकीय चलन शेतमालाच्या निर्यातीच्या मार्गान उपलब्ध होत आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) ट्रेड स्टॅटिस्टिकल रिव्ह्यू (२०२२) नुसार, २०२१ मध्ये जागतिक कृषी व्यापारात भारताच्या कृषी निर्यातीचा वाटा २.४ टक्के होता. जागतिक कृषी निर्यातदारांच्या क्रमवारीत भारत अव्वल १० मध्ये होता. २०२१-२२ मध्ये भारताच्या एकूण व्यापारी मालाच्या निर्यातीत कृषी निर्यातीचा वाटा ११.९० टक्के होता.

५) राहणीमानात सुधारणा :

देशातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा होणे आर्थिक विकासात अभिप्रेत असते. भारतातील फार मोठी लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. शेती क्षेत्र अन्नधान्य व शेतमालाची उपलब्धता करून लोकांच्या राहणीमानात वाढ होण्यास मदत करीत आहे.

६) सेवा क्षेत्राच्या विकासास साहाय्य :

भारतातील शेती क्षेत्र वाहतूक, दळणवळण, वित्तपुरवठा अशा सेवांच्या विकासास मदत करते. शेती क्षेत्राच्या प्रगतीबरोबरच अशा सेवांची मागणी वाढत आहे.

### २.२.२ उद्योग क्षेत्र :

भारतात संघटित व संघटित क्षेत्रात उद्योगांची वाढ झाली आहे. संघटित क्षेत्रातील उद्योगात लोखंड व पोलाद, सिमेंट, साखर ताग, खते, कापड, अभियांत्रिकी अशा उद्योगांचा समावेश आहे तर असंघटित क्षेत्रातील उद्योगात लघु व कुटीर,

खादी व ग्रामोद्योग वगैरेंचा समावेश होतो. देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने संघटित व असंघटित अशा दोन्ही क्षेत्रातील उद्योगांचे महत्त्व मोठे आहे. लोखंड व पोलाद, सिमेंट, पेट्रोलियम, खते, अभियांत्रिकी इत्यादी उद्योग देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत तर असंघटित क्षेत्रातील उद्योग भारतातील ग्रामीण भागात महत्त्वाची भूमिका पार पडत आहेत. भारताच्या आर्थिक विकासातील उद्योग क्षेत्राचे योगदान पुढीलप्रमाणेः

१) राष्ट्रीय उत्पन्नात मोठा वाटा :

आर्थिक विकास प्रक्रियेत देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित असते. देशातील संघटित व असंघटित क्षेत्रातील उद्योग देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर योगदान देत आहेत. देशातील औद्योगिकरणामुळे देशाच्या राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नाच्या पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. भारताच्या स्थूल मूल्यवृद्धितील उद्योग क्षेत्राचा हिस्सा २०२१-२२ मध्ये २३.३ टक्के होता. भारतातील उद्योग क्षेत्र देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात भर टाकून आर्थिक विकास प्रक्रियेत योगदान देत आहे.

२) नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर :

भारतातील मोठ्या प्रमाणावरील नैसर्गिक साधनसामग्रीचा किंवा साधनसंपत्तीचा वापर विविध अशा संघटित असंघटित क्षेत्रातील उद्योगामुळे शक्य झालेला आहे. भारतात अजूनही मोठ्या प्रमाणावर खनिज साधनसाम आणि जंगल व कृषी आधारित साधनसामग्री उपलब्ध आहे. नवीन उद्योगसंस्थांच्या विकासामुळे या साधनसामग्रीचा अधिकाधिक प्रमाणात वापर करता येत आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळण्यास मदत होत आहे. भारतातील उद्योग क्षेत्र नैसर्गिक साधनसामग्रीचा अधिकाधिक वापर करून देशाच्या आर्थिक विकासात योगदान देत आहे.

३) रोजगारात वाढ :

भारतात उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण झालेल्या आहेत. देशातील खासगी व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात देशातील फार मोठ्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध झालेला आहे. तसेच लघु उद्योग क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला आहे. उद्योग क्षेत्र रोजगारात भर टाकून व उपलब्ध मनुष्यबळाचा उत्पादक वापर करून देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेत योगदान देत आहे. औद्योगिक क्षेत्रातील रोजगार संधीत वाढ होत असल्याने शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होऊन शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत झाली आहे. तसेच देशातील बेकारीची समस्या कमी होण्यास हातभार लागला आहे.

४) भांडवल निर्मितीत वाढ :

देशाचा आर्थिक विकास घडून येण्यासाठी भांडवल निर्मितीत वाढ होणे आवश्यक असते. देशातील औद्योगिकरणात झालेल्या वाढीमुळे भांडवल निर्मितीत व भांडवल निर्मितीच्या दरात वाढ होते. उद्योगातील गुंतवणुकीत झालेल्या वाढीमुळे भांडवल निर्मितीचा दर वाढतो. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील आणि खासगी क्षेत्रातील उद्योग देशातील स्थूल देशांतर्गत भांडवल निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भांडवल निर्मितीचा वेग वाढल्यास आर्थिक विकासाचा वेग वाढतो. भारतातील उद्योग क्षेत्र भांडवल निर्मितीत भर टाकून आर्थिक विकासास हातभार लावत आहे.

५) समतोल क्षेत्रीय विकास :

भारतीय अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून असून देशातील फार मोठी लोकसंख्या व मोठ्या प्रमाणावर भांडवल या क्षेत्रात आहे. भारतात कोणत्या ना कोणत्या भागात दुष्काळ पूर अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्याचा त्या त्या भागातील शेती उत्पादनावर परिणाम होतो. देशातील औद्योगिकरणाच्या वाढत्या वेगामुळे समतोल विकास साध्य करणे शक्य होऊन शेतीवरील अवलंबित काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे.

६) शेतीच्या उत्पादकतेत वाढ :

भारतात फार मोठी लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. शेतीवर लोकसंख्येचा अतिरिक्त बोजा असल्याने शेतीची उत्पादकता कमी आहे. औद्योगिकरणामुळे उद्योग क्षेत्रातील रोजगार संधीत वाढ होऊन शेतीवरील लोकसंख्येचा भार काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढण्यास मदत होत आहे.

७) निर्यातीत महत्त्वपूर्ण सहभाग :

भारतातील औद्योगिक क्षेत्राचा निर्यातीतील वाटा महत्त्वपूर्ण आहे. औद्योगिक क्षेत्रातील विविध वस्तूंची वेगवेगळ्या देशांना निर्यात केली जात आहे. चहा, ताग, अभियांत्रिकी वगैर उद्योगांबरोबरच हस्तोद्योगाचा निर्यातीतील, सहभाग महत्त्वाचा आहे. औद्योगिक क्षेत्रातील विविध वस्तूंची वेगवेगळ्या देशांना निर्यात केली जात आहे.

८) शेती क्षेत्रास मदत :

देशात आर्थिक विकास घडून येण्यासाठी शेती, उद्योग व सेवा अशा सर्व क्षेत्रांची प्रगती होणे गरजेचे असते. उद्योगाचा विकास देशातील शेती क्षेत्राच्या विकासात मदत करतो. चहा ताग, साखर, कापड, कागद असे उद्योग शेती क्षेत्रातील उत्पादनाचा कच्चा म्हणून वापर करतात. त्यामुळे अशा शेतमालाला मागणी येते. तसेच खते, कीटकनाशके, शेतीसाठीची अवजारे, हत्यारे यांचा पुरवठा उद्योग क्षेत्राकडून शेती क्षेत्राला होतो. औद्योगिक क्षेत्र शेती क्षेत्राच्या प्रगतीस अशा प्रकारे हातभार लावते. त्यातून ते देशाच्या आर्थिक विकासात योगदान देते.

९) बाजाराच्या विकासास मदत :

भारतात विविध प्रकारच्या उद्योगांच्या विकासामुळे बाजाराचा विकास व विस्तार होण्यास मदत होत आहे. उद्योगांच्या विकासामुळे कच्च्या मालाच्या बाजारपेठेचा विस्तार होतो आणि उद्योगात तयार होणाऱ्या पक्क्या मालाची बाजारपेठ वाढते. उद्योगात विविध प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन कमी खर्चात होऊन अशा उत्पादनाची बाजारपेठ विस्तारते. त्यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होत आहे.

१०) सरकारी तिजोरीत भर :

उद्योगांच्या विकासामुळे सरकारला मिळणाऱ्या महसुलात वाढ होते. भारतातील उद्योगांच्या विकासामुळे कंपनी कर, उत्पादन शुल्क अशा विविध मार्गानि सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळत आहे. त्यातून सरकारला विकास कामांसाठी खर्च करता येत आहे.

११) दरडोई उपभोगात वाढ :

देशात उद्योगांची वाढ होत असताना औद्योगिक क्षेत्रातील अनेक वस्तूंच्या उत्पादनात वाढ झाली आहे. त्यामुळे लोकांना अधिकाधिक वस्तूंचा उपभोग घेणे शक्य होते. त्यामुळे दरडोई उपभोगात वाढ होत आहे. राहणीमानाच्या पातळीत सुधारणा होण्यास उद्योगांच्या वाढीमुळे मदत होत आहे.

१२) नागरीकरण :

आर्थिक विकास प्रक्रियेत देशात नागरीकरण किंवा शहरीकरण घडून येते. देशात औद्योगीकरण वेगाने होते तेव्हा शहरी भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढत जाते. भारतात औद्योगीकरण घडून येत असताना शहरांची वाढ झाली आहे.

### २.२.३ सेवा क्षेत्र:

भारतातील सेवा क्षेत्र पुढील विविध मार्गांनी देशाच्या आर्थिक विकासात योगदान देत आहे.

१) राष्ट्रीय उत्पन्नात मोठा वाटा :

आर्थिक विकास घडून येत असताना देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित असते. भारतातील सेवा क्षेत्र देशाच्या राष्ट्रीय उत्पत्रात भर टाकून आर्थिक विकास प्रक्रियेत योगदान देत आहे. भारताच्या स्थूल मूल्यवृद्धितीस सेवा क्षेत्राच्या हिस्सा २०२१-२२ मध्ये ६१.२ टक्के होता. राष्ट्रीय उत्पन्नात मोठा सहभाग असलेले सेवा क्षे देशाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देत आहे.

२) रोजगारात वाढ :

भारतातील एकूण रोजगारातील सेवा क्षेत्राचे प्रमाण २०१९-२० मध्ये ३०.८ टक्के होते. सेवा क्षेत्रातील रोजगार संधीत बाढ होत असून त्यामुळे देशातील बेकारीची समस्या कमी होण्यास मदत होत आहे.

३) शेती क्षेत्रास मदत :

शेतीसाठी आवश्यक असलेल्या वाहतूक, दळणवळण, साठवण व्यवस्था, वित्तपुरवठा, बँक व्यवसाय अग सेवांचा पुरवठा देशातील सेवा क्षेत्र करीत आहे. याद्वारे सेवा क्षेत्र देशातील शेती क्षेत्र व त्यातून देशाच्या आर्थिक विकासात योगदान देत आहे.

४) औद्योगीकरणास मदत :

देशातील वाहतूक, दळणवळण, बँक व्यवसाय वगैरेंची प्रगती व कामगिरी यावर उद्योगांचा विकास अवलंबू असतो. औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेल्या वाहतूक, दळणवळण, बँक व्यवसाय सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून भारतातील सेवा क्षेत्र औद्योगिक विकासात आणि त्यातून देशाच्या आर्थिक विकासात योगदान देत आहे.

५) निर्यातीत महत्त्वपूर्ण सहभाग :

भारतातील सेवा क्षेत्र परकीय व्यापारात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. भारताची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणार सेवा निर्यातीवर अवलंबून आहे. भारत प्रवास, वाहतूक, दळणवळण, विमा, सॉफ्टवेअर, व्यवसाय सेवा वित्तीय सेवा वगैरेंची निर्यात करतो. २०२०-२१ मध्ये सेवांची एकूण निर्यात २०६ अब्ज यु.एस. डॉलर होतों तर २०२१-२२ मध्ये ती २५० अब्ज यु.एस. डॉलर होती.

## २.३ भारतातील स्थूल देशांतर्गत उत्पादन आणि रोजगाराचे क्षेत्रीय वितरण :

(Sectoral Distribution of Gross Domestic Product (GDP) and Employmen in India)

भारतातील स्थूल देशांतर्गत उत्पादन आणि रोजगाराचे क्षेत्रीय वितरण याविषयी स्पष्टीकरण पुढे दिले आहे.

२.३.१ भारतातील स्थूल देशांतर्गत उत्पादनाचे क्षेत्रीय वितरण :

देशातील विविध क्षेत्रे राष्ट्रीय उत्पन्नात कशाप्रकारे योगदान देतात हे समजून घेण्यासाठी स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्य क्षेत्रीय वितरणाचा अभ्यास महत्वाचा आहे.

### 2.1 भारतीय अर्थव्यवस्थेची क्षेत्रीय रचना

(Sectoral Structure of an Economy)

कोणत्याही अर्थव्यवस्थेत तीन प्रमुख क्षेत्रे असतात. भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुन तीन क्षेत्रे म्हणजे प्राथमिक क्षेत्र, द्वितीयक क्षेत्र आणि तृतीयक क्षेत्र होय, यालाच 'अर्थव्यवस्थेची क्षेत्रीय रचना' असेही म्हणतात. अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रीय रचनेच्या आधारे विविध क्षेत्रांमधील आर्थिक क्रिया-प्रक्रियांची रचना आणि वितरण यांचे ज्ञान प्राप्त होते. प्रत्येक क्षेत्र

उत्पादनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांचे प्रतिनिधित्व करते. देशाच्या आर्थिक विकासासांठी क्षेत्रीय रचना हा सर्वांत आवश्यक आणि महत्त्वाचा घटक आहे. अर्थव्यवस्थेची क्षेत्रीय रचना म्हणजे एका वर्षात अर्थव्यवस्थेच्या एकूण जीडीपीमध्ये (स्थूल देशांतर्गत उत्पादनात) विविध क्षेत्रांचे असलेले योगदान होय, म्हणजेच एकूण स्थल देशांतर्गत उत्पादनात कृषिक्षेत्र, औद्योगिक क्षेत्र आणि सेवाक्षेत्र यांचे योगदान क्षेत्रीय रचनेच्या आधारे स्पष्ट होते. अर्थव्यवस्थेच्या विकासानुसार या तीन क्षेत्रांचे राष्ट्रीय उत्पन्नार असणारे योगदान बदलत जाते, म्हणजेच विकासाचा उच्च दर साध्य होत असतान प्राथमिक क्षेत्रावरील अवलंबित्व कमी होऊन द्वितीयक व तृतीयक क्षेत्रांचा वाटा राष्ट्रीय उत्पन्नात वाढणे अपेक्षित असते. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर अर्थव्यवस्थेत नर्वन प्रकारचे उद्योग-व्यवसाय किंवा कामे विकसित झाल्यामुळे क्षेत्रीय रचनेत बदल होऊन क्षेत्रांची संख्या बदलते. भारतात या अगोदर प्रमुख तीन क्षेत्रे म्हणजेच प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक क्षेत्र विचारात घेतली जात होती. अलीकडील काळात बदलत्या आर्थिक क्रियांनुसार अर्थव्यवस्थेत अजून दोन क्षेत्रांचा समावेश झाला आहे ते म्हणजे चतुर्थक क्षेत्र आणि पंचम क्षेत्र होय. जसजसा देश आर्थिकदृष्ट्या विकसित होत जातो तसतसे प्राथमिक क्षेत्रातून द्वितीयक तृतीयक क्षेत्रात व चतुर्थक आणि पंचम क्षेत्रातील नोकऱ्या देशात वाढत जातात, तक्ता 2.1 मध्ये अर्थव्यवस्थेतील एकूण पाच क्षेत्रे व या क्षेत्रांमध्ये समाविष्ट उद्योगांची माहित दिली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत प्रमुख पाच क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत -

तक्ता क्र. 2.1 : अर्थव्यवस्थेतील क्षेत्रीय रचना

आर्थिक क्रिया-प्रक्रिया

प्राथमिक क्षेत्र

प्राथमिक क्षेत्रात केलेल्या कामातून कच्चा माल आणि कृषिमाल तयार होतो. यामध्ये शेती, खाणकाम, मासेमारी आणि वनीकरण इत्यादींचा समावेश होतो. नैसर्गिक साधनसामग्रीशी संबंधित व्यवसाय या क्षेत्रात येतात. उदा., शेती, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, खाणकाम या व्यवसायांचा समावेश प्राथमिक क्षेत्रात होतो. द्वितीयक प्राथमिक क्षेत्रातून प्राप्त वस्तूवर प्रक्रिया करून दुसऱ्या प्रकारच्या वस्तू तयार क्षेत्र केल्या जातात, त्यामुळे यास 'उद्योग क्षेत्र' असेही म्हणतात. दुय्यम क्षेत्रातील उद्योगांमध्ये कच्चा माल अधिक मौल्यवान, उत्पादित वस्तूंमध्ये बदलणे समाविष्ट आहे. सामान्यतः हे उद्योग कारखान्यांमध्ये केले जातात. उदा., कारखानदारी, बांधकाम, वीजनिर्मिती या व्यवसायांचा समावेश द्वितीयक क्षेत्रात होतो. तृतीयक प्राथमिक व द्वितीयक क्षेत्रांना पूरक सेवांचा समावेश तृतीयक क्षेत्रात होतो, क्षेत्र याला 'सेवाक्षेत्र' असेही म्हणतात. इतरांना सेवा प्रदान करणाऱ्या लोकांचा समावेश होतो. ही सेवाक्षेत्रे टॅक्सी ड्रायव्हरपासून नर्सपर्यंत काहीही असू शकतात. चतुर्थक क्षेत्र उदा., व्यापार, वाहतूक, दळणवळण, संरक्षण, प्रशासन यांचा समावेश तृतीयक क्षेत्रात होतो. या क्षेत्रातील बऱ्याच नोकऱ्यादेखील सेवा आहेत. परंतु तृतीयक नोकऱ्यांपेक्षा अधिक शिक्षण आणि कौशल्य आवश्यक असते. यात माहिती-तंत्रज्ञान, व्यावसायिक, स्टॉक ब्रोकर्स आणि उत्पादन विकासक यांचा समावेश होतो. या क्षेत्रामध्ये उच्च बौद्धिक क्षमतेचा वापर होतो. उच्च ज्ञानाशी संबंधित संकल्पनांची निर्मिती, संशोधन व विकास यांचा संबंध चतुर्थक क्षेत्राशी येतो. उदा., सॉफ्टवेअर, माहिती-तंत्रज्ञान, संशोधन व विकास इत्यादी.

पंचम क्षेत्र

या क्षेत्रात सरकारी अधिकारी, मोठ्या कॉर्पोरेट सेक्टरमधील उच्च अधिकारी आणि संशोधन शास्त्रज्ञ तसेच पोलीस, लष्कर आणि अगदी ना-नफा संस्था किंवा धर्मादाय संस्थादेखील आढळतात. पंचम क्षेत्रात समाजातील व अर्थव्यवस्थेतील सर्वोच्च स्तरावरील निर्णय प्रक्रियेचा समावेश होतो. उदा., सरकार, विज्ञान, विद्यापीठे, आरोग्यसेवा या क्षेत्रातील उच्चस्तरीय संचालक व अधिकारी यांचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेची क्षेत्रीय रचना उत्पादन केलेल्या वस्तू आणि सेवांच्या प्रकारांवर अाधारित वेगवेगळ्या क्षेत्रामध्धना उत्पादन केले जातात याचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी महत्वाचे ठरते. अर्थव्यवस्थेत प्रमुख तीन क्षेत्रे आहेत -

(1) प्राथमिक क्षेत्र : या क्षेत्रामध्ये कच्चा माल आणि नैसर्गिक संसाधने काढणे आणि उत्पादन करणे यांचा समावेश आहे. या क्षेत्रात कृषी, वनीकरण, मासेमारी, खाणकाम, कच्चा माल काढणे इत्यादी उद्योगांचा समावेश होतो. भारत हा लोकसंख्येच्या दृष्टीने एक विशाल देश आहे, परिणामी, भारतात लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात भिन्न आर्थिक परिस्थिती आढळून येते. त्यामुळे भारतात लोक नैसर्गिक साधनसंपत्तीतून आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी मोठ्या प्रमाणात या प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून आहेत. कृषी हे भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वांत महत्त्वाचे आणि सर्वांत मोठे क्षेत्र आहे. या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वाढत्या लोकसंख्येला रोजगार देण्याची क्षमता आहे तसेच या क्षेत्रात बेरोजगारीची प्रमुख समस्यादेखील दिसून येते. देशातील बहुतांश आर्थिक व्यवहारांसाठी कृषिक्षेत्र म्हणजेच प्राथमिक क्षेत्र महत्त्वाची भूमिका पार पाडते.

(2) द्वितीयक किंवा दुय्यम क्षेत्र या क्षेत्राला औद्योगिक क्षेत्र म्हणूनही ओळखले जाते. यामध्ये कच्च्या मालावर प्रक्रिया करणे आणि तयार वस्तूंचे उत्पादन करणे समाविष्ट आहे. द्वितीयक क्षेत्रात उत्पादन, बांधकाम, वीज, गॅस, पाणीपुरवठा यांसारख्या आर्थिक क्रिया प्रक्रियांचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये द्वितीयक क्षेत्र महत्त्वाची भूमिका पार पाडते. लोकसंख्येचे प्राथमिक क्षेत्रावरील अवलंबित्व कमी होऊन द्वितीयक

क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढणे हे आर्थिक प्रगतीचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

(3) तृतीयक क्षेत्र: प्राथमिक व द्वितीयक क्षेत्रांना पूरक सेवांचा पुरवठा करणारे हे

क्षेत्र तृतीयक क्षेत्र म्हणून ओळखले जाते, यालाच 'सेवाक्षेत्र' असेही म्हणतात. व्यापार, वाहतूक, दळणवळण, संरक्षण, प्रशासन यांचा समावेश तृतीयक क्षेत्रात होतो. प्राथमिक व द्वितीयक क्षेत्रांच्या विकासासाठी सेवाक्षेत्र महत्त्वाची भूमिका पार पाडते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या एकूण रोजगारनिर्मितीत सेवाक्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते. देशाचा जसजसा विकास होत जातो तसतसे सेवाक्षेत्राची प्रगती वाढते. अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्राचा विकास वेगाने होणे हे आर्थिक प्रगतीचे मुख्य उद्दिष्ट मानले जाते.

वरील तीन महत्त्वाची क्षेत्रे अर्थव्यवस्थेतील विकास प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडतात. अर्थव्यवस्था विकासाचा उच्च दर साध्य करीत असताना अजून दोन क्षेत्रांचा समावेश अर्थव्यवस्थेत होतो.

(4) चतुर्थक क्षेत्र : या क्षेत्रात संशोधन आणि विकास, माहिती-तंत्रज्ञान आणि

बौद्धिक सेवा यांसारख्या ज्ञानाधारित सेवांचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेच्या विकासात हे क्षेत्र महत्त्वाची भूमिका पार पाडते. उच्च बौद्धिक क्षमतेचा वापर या क्षेत्रामध्ये होतो. उच्च ज्ञानाशी संबंधित सर्व घटकांचा समावेश चतुर्थक क्षेत्रात होतो. अर्थव्यवस्थेत या क्षेत्राचा विकास होणे हे विकासाचे प्रमुख लक्षण आहे. अर्थव्यवस्थेत या क्षेत्राचा विकास जेवढा मोठ्या प्रमाणात होईल तेवढी अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर एक सामर्थ्यशाली अर्थव्यवस्था म्हणून उदयास येते.

अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रीय संरचनेबाबत अभ्यासाची गरज किंवा महत्त्व

(1) विकासाचा टप्पा : विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये प्राथमिक क्षेत्रात रोजगार आणि जीडीपीचा जास्त वाटा असतो, कारण कृषी आणि उत्खनन उद्योगांचे वर्चस्व असते. जसजशी अर्थव्यवस्था विकसित होत जाते, तसतसे औद्योगिकीकरण आणि शहरीकरण प्रतिबिंबित करणारे द्वितीयक आणि तृतीयक क्षेत्रांकडे वळते.

(2) विविधीकरण वैविध्यपूर्ण क्षेत्रीय संरचना बाह्य धक्क्यांसाठी लवचीकता आणि कमी असुरक्षा दर्शविते. प्राथमिक, द्वितीयक आणि तृतीयक क्षेत्रांचे संतुलित मिश्रण असलेल्या अर्थव्यवस्था कोणत्याही विशिष्ट क्षेत्रातील आर्थिक मंदीचा सामना करण्यासाठी अधिक सुसज्ज असतात.

(3) रोजगार पद्धतीवर प्रभाव क्षेत्रीय संरचना अर्थव्यवस्थेतील रोजगार पद्धतींवर प्रभाव टाकते. विकसनशील देशांमध्ये कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा प्राथमिक क्षेत्रात कार्यरत असू शकतो, तर प्रगत अर्थव्यवस्थांमध्ये तृतीयक क्षेत्र रोजगारावर वर्चस्व गाजवते.

(4) उत्पादकता आणि नवोन्मेष विविध क्षेत्रे उत्पादकता आणि नावीन्यपूर्ण पातळीचे वेगवेगळे प्रदर्शन करतात. द्वितीयक आणि तृतीयक क्षेत्रे, विशेषतः तंत्रज्ञान आणि ज्ञानकेंद्रित सेवांमध्ये गुंतलेले उद्योग, बहुतेकदा उत्पादकता वाढ आणि तांत्रिक प्रगती चालवितात, जे एकूण आर्थिक वाढीस हातभार लावतात.

(5) धोरणाचे परिणाम प्रभावी आर्थिक धोरणे आखण्यासाठी धोरणकर्त्यांसाठी क्षेत्रीय संरचना समजून घेणे महत्त्वाचे आहे. उदा., औद्योगिकीकरण, पायाभूत सुविधांचा विकास आणि मानवी भांडवलामधील गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारी धोरणे द्वितीयक आणि तृतीयक क्षेत्रातील वाढीस चालना देऊ शकतात, ज्यामुळे आर्थिक परिवर्तन आणि विकास सुलभ होतो.

अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रीय संरचनेचे विश्लेषण केल्याने तिची गतिशीलता, आव्हाने, वाढ आणि विकासाच्या संभाव्यतेबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी मिळते.

विविध क्षेत्रांमधील योगदान आणि परस्परावलंबन समजून घेऊन धोरणकर्ते, व्यावसायिक आणि भागधारक शाश्वत आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी धोरणे तयार करू शकतात.

## 2.2 भारताच्या आर्थिक विकासातील योगदान : कृषी, उद्योग व सेवा क्षेत्र

(Contribution in Economic Development of India: Agriculture, Industry and Service Sector)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या बऱ्याचशा काळात भारतामध्ये समाजवादी अर्थव्यवस्थेचा मार्ग अवलंबिण्यात आला. भारतात सुरुवातीस खासगी क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेतील सहभागावर, परदेशांशी व्यापारावर आणि इतर देशांकडून भारतात होणाऱ्या थेट गुंतवणुकीवर कडक बंधने होती. मात्र 1990 च्या दशकाच्या सुरुवातीपासून भारताने हळूहळू परकीय गुंतवणुकीवरील आणि व्यापारावरील नियंत्रण कमी करून आपली अर्थव्यवस्था आर्थिक सुधाराद्वारे खुली करायला सुरुवात केली आहे.. भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलर्सच्या विनिमय दरानुसार सप्टेंबर 2022 मध्ये जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. 2022 नुसार भारताचे वार्षिक सकल उत्पन्न (जीडीपी) 854.7 अब्ज डॉलर्स एवढे आहे. क्रयशक्ती समानतेचा Purchasing Power Parity अथवा संक्षिप्त रूपात PPP) निकष लावला तर भारताच्या अर्थव्यवस्थेचा जगात तिसरा क्रमांक लागतो. जगातील सर्वांत वेगात वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा चीनपाठोपाठ दुसरा क्रमांक आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्यता दिसून येते. शेती, हस्तव्यवसाय, कापड-गिरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन-तृतीयांश लोकांचा उदरनिर्वाह अजूनही शेती अथवा शेतीशी संबंधित उद्योगांवर चालतो, परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवांचाही वाढता वाटा आहे आणि अलीकडे सेवांवर आधारित व्यवसायही अर्थव्यवस्थेत अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अलीकडील काही वर्षांत भारतातील संगणक तंत्रज्ञान आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरुण पिढीमुळे भारत हळूहळू सर्व जगाला बाह्यस्रोताच्या (Outsourcing) सेवा पुरविणारा देश म्हणून भूमिका बजावीत आहे. भारत हा अतिकुशल तंत्रज्ञ पुरविणारा जगातील सर्वांत मोठा निर्यातक देश आहे. याचबरोबर उत्पादन, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसूक्ष्म तंत्रज्ञान, दूरसंचार, जहाजनिर्माण, विमाननिर्माण, आणि पर्यटन या क्षेत्रांमधील भारताची क्षमताही वेगाने वाढताना दिसत आहे. भारत ही जगातील सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि वर्ष 2047 पर्यंत म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत उच्च मध्यम उत्पन्नाच्या स्थितीपर्यंत पोहोचण्याच्या आकांक्षांसह या मार्गावर पुढे जाण्यासाठी समाज उत्पल भारत शतकाच्या अखेरीस सर्वांत मोठी आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येईल. सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) चीनच्या तुलनेत 90% आणि अमेरिकेपेक्षा 30% जास्त असेल असे सेंटर

फॉर इकॉनॉमिक्स अँड बिझनेस रिसर्च (CEBR) ने आपल्या अहवालात म्हटले आहे. अतिशय वेगात वाढणारी लोकसंख्या आणि वाढती आर्थिक आणि सामाजिक विषमता हे भारतापुढील महत्त्वाचे प्रश्न आहेत. गरिबी हाही गंभीर प्रश्न आहे. मात्र स्वातंत्र्य- प्राप्तीनंतर गरिबीचे प्रमाण बरेच घटत असल्याचे दिसते. दारिद्र्य कमी करण्यासाठी व त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी देशपातळीवर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. देशाच्या विकासदरात वाढ होत असताना अर्थव्यवस्थेतील प्राथमिक, द्वितीयक आणि तृतीयक क्षेत्रे महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत.

लोकसंख्यानिहाय भारतीय अर्थव्यवस्था सर्वांत जास्त कृषीवर अवलंबून आहे. भारताची लोकसंख्या जगातील सर्वांत जास्त आहे आणि यांपैकी 50% लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने शेतीवर अवलंबून आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि ती देशातील रोजगार, अन्नधान्य आणि कच्च्या मालाच्या पुरवठ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. दुसरे स्थान सेवाक्षेत्राला आहे. सेवाक्षेत्र हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे क्षेत्र आहे आणि ते देशाच्या जीडीपीच्या सुमारे 50% वाटा देते. सेवाक्षेत्रात विविध व्यवसाय आणि उद्योगांचा समावेश होतो. उदा., पर्यटन, वित्त, वाहतूक आणि व्यापार, उद्योग क्षेत्र हे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे क्षेत्र आहे आणि ते देशाच्या जीडीपीच्या सुमारे 25% वाटा देते. उद्योग क्षेत्रात विविध प्रकारच्या उद्योगांचा समावेश होतो. उदा., उत्पादन, बांधकाम आणि ऊर्जा.

### 2.2.1 भारताच्या आर्थिक विकासात कृषी/शेती क्षेत्राचे योगदान (Contribution of Agriculture Sector to Economic Development in India)

विकसनशील आणि अविकसित राष्ट्रांमध्ये त्यांच्या आर्थिक विकासात आणि रोजगार- निर्मितीमध्ये कृषिक्षेत्र नेहमीच महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. प्राचीन काळापासून कृषिक्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. कृषी हा भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात, रोजगारात, औद्योगिक विकासात, विदेशी व्यापारात आणि एकंदरीतच देशाच्या आर्थिक विकासात कृषिक्षेत्राचे स्थान महत्त्वाचे आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे (Agriculture is the Axle of Indian Economy) असे म्हटले जाते. यावरूनच आपल्याला कृषिक्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेतील असणारे महत्त्व लक्षात येते.

अल्पविकसित आणि विकसनशील राष्ट्रांचा आर्थिक विकास हा कृषिक्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे. भारतात नैसर्गिक संसाधने प्रचंड प्रमाणात उपलब्ध असली तरी भांडवलाच्या कमतरतेमुळे औद्योगिकीकरणाचा वेग अल्प आहे. परिणामी, वाढत्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम कृषिक्षेत्राने केले आहे. देशातील श्रमिकांना कृषी व कृषीआधारित उद्योगात रोजगाराची उपलब्धता होत असते. देशातील बेकारीचे प्रमाण कमी करण्यात कृषिक्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. भारतामध्ये भांडवलाची कमतरता मोठ्या प्रमाणात आहे. या भांडवलाच्या कमतरतेवर कृषिक्षेत्राच्या माध्यमातून मात करता येते. कारण कृषिक्षेत्रात भांडवल उत्पादन गुणोत्तर कमी असते व त्यामुळे कमी भांडवल गुंतवून मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळविता येते. कृषिक्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात विदेशी चलनाची आवश्यकता ही औद्योगिक क्षेत्राएवढी नसते. यामुळेच स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारताचा आर्थिक विकास घडवून आणताना औद्योगिक क्षेत्राबरोबरच कृषिक्षेत्रालाही महत्त्वाचे स्थान पंचवार्षिक योजनांमध्ये दिले आहे. (1) राष्ट्रीय उत्पन्नात महत्त्वपूर्ण हिस्सा (Important Contribution in Country National Income): स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषिक्षेत्राचा हिस्सा इतर क्षेत्रांच्या तुलनेत सर्वांत जास्त होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगिक व सेवाक्षेत्राच्या झालेल्या विकासामुळे कृषिक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी होत आहे. तरीही इतर विकसित देशांच्या तुलनेत कृषिक्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा अधिक आहे. 1950-51 मध्ये कृषिक्षेत्राचा भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील हिस्सा 56.46% होता. 2005-06 मध्ये तो 21.74% पर्यंत कमी झाला. तर 2011-12 मध्ये त्याचे प्रमाण 14.1% पर्यंत कमी झाले. इतर प्रगत देशांशी तुलना करता अमेरिकेतील एकूण कार्यकारी लोकसंख्येच्या (14 ते 64 वयोगटातील) 2 ते 3% लोकसंख्या कृषिक्षेत्रात कार्यरत आहे तर फ्रान्समध्ये हे प्रमाण 7% तर ऑस्ट्रेलियात 6% इतके आहे.

(2) उत्पादन योगदान (Product Contribution): बहुसंख्य अविकसित किंवा विकसनशील राष्ट्र अन्नधान्य आणि स्वतःच्या उपभोगासाठी कृषिक्षेत्रावर अवलंबून असतात. तथापि, अपवाद म्हणून मलेशिया आणि सौदी अरेबियासारखी काही राष्ट्र आहेत जी त्यांच्या तेल आणि वायूसारख्या नैसर्गिक संसाधनांची निर्यात करतात ज्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळविण्यास मदत होते आणि कमावलेले हे प्रचंड परकीय चलन त्यांना त्यांच्या लोकसंख्येसाठी त्यांच्या संपूर्ण अन्नधान्याच्या गरजा आयात करण्यास मदत करते. हे देश अपवाद असले तरी इतर सर्व विकसनशील राष्ट्रांना परकीय चलनाचा इतका मोठा साठा नाही की, ज्यातून ते त्यांच्या संपूर्ण देशाच्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागवू शकतील आणि म्हणून त्यांना यावर अवलंबून राहावे लागते. त्यांची स्वतथीनी यांच्या संपूर्ण लोकसंख्येला पोसण्यासाठी पुरेसे अन्नधान्य करते. विकसनशील किंवा अविकसित राष्ट्रांमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या जगण्याच्या गरजेपेश जास्त अन्नधान्य उत्पावन करावे लागते, कारण त्यांना त्यांच्या शहरी लोकसंग्र आवश्यक प्रमाणात अन्नधान्य पुरवावे लागते, विकसनशील राष्ट्रांमधील शेतकऱ्यांक अन्नधान्याचे विक्रीयोग्य अधिशेष असणे आवश्यक आहे जे या दोन्ही क्षेत्रांच्या वाढीसाई शेवटी आवश्यक असलेल्या दुय्यम आणि तृतीयक दोन्ही क्षेत्रांमध्ये कामगार म्हणून कार्यरत असलेल्या लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजा पूर्ण करण्यास मदत करेल, द्वितीयक आणि तृतीयक क्षेत्रांच्या वाढीसह हे तितकेच महत्त्वाचे आहे की, कृषिक्षेत्राची वाढ अशरा दराने होते जी वाढत्या कर्मचाऱ्यांच्या अन्नधान्याच्या गरजेशी जुळते आणि दुय्यम तसेच तृतीयक क्षेत्राची वाढ टिकवून ठेवण्यास मदत करते. कृषी विकास हा औद्योगिक विकासाशी जुळला पाहिजे कारण जर कृषी उत्पादनात कमतरता असेल तर परकीय चलनाच्या साठ्याच्या कमतरतेमुळे अन्नधान्य आयात करणे शक्य होत नाही. हे दळणवळण, औद्योगिक किंवा दुय्यम क्षेत्रावर विपरीत परिणाम करेल कारण व्यापाराच्या अटी दुय्यम किंवा औद्योगिक क्षेत्राच्या विरोधात जातील आणि यामुळे शेवटी वाढीची प्रक्रिया यांबेल, कारण औद्योगिक उत्पादन यापुढे फायदेशीर राहणार नाही. याचा परिणाम अर्थव्यवस्था ठप्प होण्यात होईल.

(3) घटक योगदान (Factor Contribution): विकसनशील देशांच्या लोकसंख्येपैकी जवळपास 60% लोकसंख्या शेतीमध्ये गुंतलेली आहे, म्हणून कृषिक्षेत्रान कार्यरत असलेल्या अशा कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण दिल्यास कृषिक्षेत्र हे दुय्यम अपि तृतीयक क्षेत्रांना मोठ्या प्रमाणात कामगार पुरवठा करू शकते. हे तेव्हाच घडू शकते जेवा औद्योगिक किंवा तृतीयक क्षेत्रातील उत्पादकता वाढते. लुईसच्या 'मजुरांच्या अमर्याव पुरवठ्यासह विकासाच्या मॉडेल' मध्ये कृषिक्षेत्रातील प्रच्छन्नपणे बेरोजगार असलेले अतिरिक्त कामगार एकत्रीकरण औद्योगिक किंवा दुय्यम क्षेत्राच्या वाढीसाठी आणि विस्तारासाठी आवश्यक आहे आणि विस्तारित उद्योगांमध्ये रोजगारनिर्मितीसाठी भांडवल संचय आवश्यक आहे. कामगारांसाठी कमी वेतन दर म्हणजे औद्योगिक किंवा द्वितीयक क्षेत्रासाठी उत्पादन खर्च कमी असेल ज्यामुळे उद्योगपतींना मोठा नफा मिळेल, जे या नफ्यांची पुढील औद्योगिक विकासासाठी आणि भांडवली संचयनासाठी पुन्हा गुंतवणूक करू शकतात. भारतासारख्या देशात जिथे लोकशाही व्यवस्था आहे आणि प्रत्येकाला स्वतःचा व्यवसाय निवडण्याचा अधिकार आहे तिथे कृषिक्षेत्रात काम करणाऱ्या मजुरांना जोपर्यंत कृषी उत्पादनात वाढ होत नाही तोपर्यंत त्यांना औद्योगिक क्षेत्रात स्थलांतर करण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. 1960 च्या दशकाच्या मध्यात झालेल्या हरित क्रांतीने कृषिक्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या वापरामध्ये क्रांती घडवून आणण्यात आणि कृषिक्षेत्रात विक्रीयोग्य अधिशेषनिर्मिती करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

(4) भांडवलाचा स्रोत (Source of Capital): विकसनशील राष्ट्रांमध्ये औद्योगिक वाढीसाठी कृषी हे भांडवलनिर्मितीचे प्रमुख साधन असू शकते. अनेक गरीब विकसनशील राष्ट्रांमध्ये कृषी उत्पन्न असमानपणे वितरित केले जाते म्हणून ग्रामीण भागात राहणारे आणि उच्च उत्पन्न असलेले लोक त्यांच्या बचतीची औद्योगिक विकासामध्ये गुंतवणूक करू शकतात. शेतीतून मिळणारा जमीन महसूल हा भारतातील राज्याच्या उत्पन्नाचा नगण्य स्रोत आहे. डॉ. के. एन. राज यांच्या नेतृत्वाखालील समितीने आर्थिक विकासासाठी कृषिक्षेत्रातून बचत हस्तांतरित करण्यासाठी 'कृषी होल्डिंग टॅक्स' सुचविला आहे.

(5) बाजार योगदान (Market Contribution): हे औद्योगिक उत्पादनांच्या मागणीवर प्रतिबिंबित होते. विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात जेव्हा शहरी क्षेत्र फारसे विकसित झालेले नसते आणि निर्यात बाजार अजूनही दूरचे स्वप्न असते तेव्हा अविकसित राष्ट्रांमधील कृषिक्षेत्र ही औद्योगिक उत्पादनांची प्रमुख बाजारपेठ असते. साखर, ताग, बी कापूस इत्यादी नगदी पिकांचे उत्पादन विकून जे उत्पन्न मिळवितात ते शेतकरी औद्योगिक मालावर खर्च करतात. शेतकऱ्यांनी त्यांच्या विक्रीयोग्य अतिरिक्त अन्नधान्याची विक्री करून जे उत्पन्न मिळविलेले असते त्याचाही वापर केला जातो.

औद्योगिक क्षेत्रामध्ये अधिक प्रमाणात वृद्धी होण्यासाठी औद्योगिक वस्तूंची मागणी वाढविणे आवश्यक आहे. भारतामध्ये असे आढळून आले आहे की, जेव्हा-जेव्हा कृषिक्षेत्रामध्ये मंद किंवा नकारात्मक वाढ होते तेव्हा तेव्हा औद्योगिक उत्पादनांच्या मागणीच्या कमतरतेमुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. जेव्हा कृषी उत्पादकता आणि उत्पादनात वाढ होते तेव्हा औद्योगिक वस्तू आणि सेवांच्या मागणीत वाढ होते आणि यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढतो.

शेती/कृषी आणि उद्योग यांचा थेट संबंध आहे. शेतीमुळे विविध औद्योगिक उत्पादनांना मागणी निर्माण होते आणि त्या बदल्यात उद्योगांना अन्न आणि कच्च्या मालाचा पुरवठा होतो. कच्च्या मालामध्ये ऊस, ताग, कापूस, तेलबिया इत्यादींचा समावेश होतो. कृषिक्षेत्र- देखील कृषी आधारित उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा करते जसे की, साखर उत्पादन उद्योग, हातमाग उद्योग व विणकाम उद्योग इत्यादी, जेव्हा कृषीची वाढ मंद असते तेव्हा या कृषीआधारित उद्योगांना कच्च्या मालाचा नियमित आणि आवश्यक पुरवठा होऊ शकणार नाही. कृषिक्षेत्राची जलद आणि निरोगी वाढ ही जलद औद्योगिक वाढीची पूर्वअट आहे. याचा औद्योगिक मालाच्या संबंधात कृषी उत्पादनांच्या किमतीवर परिणाम होतो. हेच कृषी आणि उद्योग यांच्यातील व्यापाराच्या अटी ठरविते. कमी कृषी किमतीचा अर्थ उद्योगासाठी स्वस्त कच्चा माल आणि अन्नधान्य आहे ज्यामुळे खर्च कमी होतो आणि शेवटी नफ जास्त होतो. शेतीच्या दृष्टिकोनातून कमी किमतीचा अर्थ शेतकऱ्यांचे कमी उत्पन्न, ज्यामुळे औद्योगिक वस्तू खरेदी करण्याच्या त्यांच्या क्रयशक्तीवर परिणाम होतो.

कृषिमालाच्या किमती कमी झाल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी होईल. म्हणून कृषिक्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्र यांच्यातील व्यापाराच्या अटींचा समतोल साधण्यासाठी, कृषिमालाची किंमत जास्त नसावी किंवा ती इतकी कमीही नसावी की, ज्यामुळे कृषिक्षेत्र आणि शेतकऱ्यांचे शोषण होईल. परिणामी, कृषी उत्पादकताही कमी होईल.

(6) परकीय चलन योगदान (Foreign Exchange Contribution): कर्म औद्योगिक विकासासह आर्थिक विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात, कृषी उत्पादनांची निर्यात ही अविकसित देशांसाठी परकीय चलन कमावण्याचा मुख्य स्रोत असू शकतो. कृषिक्षेत्र हे प्राथमिक वस्तूंच्या निर्यातीतून परकीय चलन मिळविते.

आर्थिक विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात, विकसनशील देशांना परकीय चलनाच्या मोठ्या संकटाचा सामना करावा लागतो किंवा ज्याला त्यांच्या औद्योगिक विकासासाठी औद्योगिक वस्तूंच्या आयातीची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी 'परकीय चलन अंतर' म्हणून संबोधले जाते. प्राथमिक वस्तूंची निर्यात करून कृषी परकीय चलनाच्या कमाईत योगदान देते ज्यामुळे विकसनशील राष्ट्रांना त्यांच्या औद्योगिक वाढीसाठी आवश्यक असलेल्या औद्योगिक वस्तूंची आयात करता येते. या वस्तू आयात करणाऱ्या देशात यांचे उत्पादन केले जाऊ शकत नाही. त्यामुळे औद्योगिक विस्तारासाठी लागणारा औद्योगिक कच्चा माल आणि भांडवली वस्तू आयात करण्यासाठी लागणारे परकीय चलन मिळवून देशाच्या आर्थिक विकासात योगदान देण्यात कृषिक्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावू शकते. परकीय चलनाचा तुटवडा किंवा कमतरता विकसनशील राष्ट्रांच्या विकास प्रक्रियेत मोठा अडथळा म्हणून काम करते. भारताच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत गुंतवणुकीच्या संसाधनांच्या वाटपामध्ये कृषिक्षेत्राकडे तुलनेने दुर्लक्ष करण्यात आले, त्यामुळे वाढीची प्रक्रियाही ठप्प झाली, कारण मूलभूत अन्नधान्याच्या गरजाही पुरेशा प्रमाणात परकीय चलन शिल्लक नसल्यामुळे आयात करणे अशक्य होते.

(7) कृषी व दारिद्र्यनिर्मूलन (Agriculture and Poverty Alleviation):

भारतात बहुसंख्य गरीब लोक देशाच्या ग्रामीण भागात राहतात. स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतरही आजही सुमारे 40% भारतीय ग्रामीण लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जगते आणि त्यातील बहुसंख्य अल्पभूधारक शेतकरी, अनुसूचित जाती आणि जमाती, भूमिहीन शेतमजूर आहेत. भारतीय नियोजन आयोगाचे माजी उपाध्यक्ष मॉंटेकसिंग अहलुवालिया म्हणाले की, कृषी विकासामुळे गरिबी कमी होते. दारिद्र्यनिर्मूलनासाठी आखलेल्या कोणत्याही धोरणात कृषिक्षेत्राचा विकास महत्त्वाची भूमिका बजावतो. कृषिक्षेत्राच्या वृद्धीमुळे लहान आणि सीमांत शेतकऱ्यांची उत्पादकता तसेच उत्पन्न पातळी दोन्ही वाढण्यास मदत होते आणि रोजगार पातळी तसेच कृषी कामगारांची वेतन पातळी सुधारते. अशा प्रकारे ते दारिद्र्य तसेच प्रच्छन्न बेरोजगारी दोन्हींमध्ये मदत करते. कृषी उत्पादकता वाढल्याने अन्नधान्याच्या किमती कमी होतात आणि त्यामुळे महागाई नियंत्रणात राहण्यास मदत होते आणि त्यामुळे दारिद्र्याची पातळी कमी होण्यास हातभार लागतो.

(8) रोजगारनिर्मितीमध्ये शेतीचे योगदान (Contribution of Agriculture to Employment Generation): कामगार अधिशेष असलेल्या विकसनशील राष्ट्रांसाठीच्या मूलभूत विकास प्रतिमानांमध्ये त्यांपैकी लुईसचे वृद्धीचे श्रमाचे अमर्याद पुरवठा प्रतिमान तसेच मूलभूत आणि अवजड उद्योगांना अधिक महत्त्व देणारे महालनोबिस वृद्धी प्रतिमान जे वाढत्या किंवा विस्तारणाऱ्या औद्योगिक क्षेत्रात कृषिक्षेत्राला रोजगार देण्यासाठी कृषिक्षेत्रामधून अतिरिक्त श्रम काढून घेण्याचा मुद्दा अधोरेखित करतात.

तथापि, असे आढळून आले आहे की, शेतीतून अतिरिक्त श्रम काढून घेण्याऐवजी, आधुनिक उद्योग हे गहन भांडवलप्रधान होते आणि त्यांनी अतिशय कमी किंवा मर्यादित रोजगाराच्या संधी निर्माण केल्या ज्या शहरी भागात उघडपणे बेरोजगारांना कामावर ठेवण्यास सक्षम नाहीत. कृषिक्षेत्रातील वाढ ही चांगली रोजगार क्षमता प्रदान करते. तथापि, कृषर्षा विकासातूनही रोजगार क्षमता निर्माण करण्यासाठी कृषी विकासाचे योग्य धोरण अवलंबिणे आवश्यक आहे. नवीन कृषी तंत्रज्ञान जसे की, उच्च उत्पादन मूल्य बियाणे, कीटकनाशके, खतांसह सिंचनासाठी इष्टतम प्रमाणात पाण्याचा वापर केल्यास कृषिक्षेत्रातील रोजगाराची पातळी वाढण्यास मदत होईल. उच्च उत्पादन देणाऱ्या तंत्रज्ञानासारख्या निविष्ठांचे रूपांतर शेतकऱ्यांना एकपेक्षा अधिक पीक घेण्यास मदत करते ज्यामुळे कृषिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार क्षमता निर्माण होते. सिंचन सुविधा आणि इतर कृषी पायाभूत गरजा सुधारण्यासाठी आणि विस्तारित करण्यासाठी कृषिक्षेत्रातील भांडवली गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे जेणेकरून भारतातील शेतकरी नवीन उच्च उत्पादन तंत्रज्ञानाचा लाभ घेऊ शकतील, भारताच्या ग्रामीण भागात उच्च-उत्पादन देणाऱ्या तंत्रज्ञानाच्या व्यापक प्रसारामुळे केवळ कृषी उत्पादकताच वाढणार नाही तर कृषिक्षेत्रातील रोजगाराची पातळीही उंचावेल. पूर्ण रोजगाराची संभाव्य कृषी वाढ साध्य करण्यासाठी, शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर निवडक पद्धतीने केला पाहिजे. यापुढे कृषिक्षेत्रातील रोजगार पातळी वाढविण्यासाठी, भाडे करार सुधारणा आणि जमीनधारणेवर कमाल मर्यादा लावून जमिनीचे वितरण यांसारख्या भूमिसुधारणा प्रभावीपणे राबविल्या जाव्यात, कारण लहान शेतकरी अधिक श्रम, उच्च पीक तीव्रता आणि उच्च उत्पादकता प्रदान करतात.

**2.2.2 भारताच्या आर्थिक विकासात उद्योग/औद्योगिक क्षेत्राचे योगदान (Contribution of Industrial Sector to** Economic Development in India)

19 व्या शतकात व्यापारातूतु विकासाचे प्रारूप जरी स्वीकारले गेले तरी आज ते मात्र पडले आहे. वरडोई उपभोग पातळीतील वाढीमुळे वस्तू व सेवांचे उपभोगातील प्रमा बदलले तसेच तांत्रिक बदलांमुळे नवीन मालाचा अधिक काटकसरीने उपयोग शक्य होड लागला, तसेच कृत्रिम पर्यायदेखील निर्माण झाले. परिणामतः प्रगत देशांकडून प्राथमिक वस्तूंसाठी असलेली मागणी कमी होऊ लागली आता अशा वस्तूंचे उत्पादन व विक्री करणाऱ्या देशांच्या उत्पन्नात व उत्पादनात घट होड लागली आहे. अशा देशांच्या निर्यातीचे प्रमाण दरवर्षी 3.6 टक्क्यांनी वाढले तर विकसित देशांच्या निर्यातीचे प्रमाण 6.2 टक्क्यांनी वाढले. निर्यातीतील या तफावतीचा विपरीत परिणाम त्यांच्या

व्यापारशर्तीवर होऊ लागला औद्योगिकीकरण हे अशा अल्पविकसित देशांच्या समस्यांवरील एकमेव उत्तर आहे. वा व्यापारातील तफावतीप्रमाणेच या देशांमध्ये सातत्याने वाढणारी लोकसंख्या व कृषिक्षेत्रातील घटते उत्पादन यामुळे गरिबीच्या दुष्टचक्रात हे देश सापडले आहेत. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी आणि विकास घडवून आणण्यासाठी कमी उत्पादकता असलेल्या व्यवसायाऐवजी अधिक उत्पादकता असलेल्या व्यवसायात सर्वंकष वाढ होणे आवश्यक आहे. सामान्यतः दरडोई निव्वळ उत्पादन मूल्य हे कृषिक्षेत्रापेक्षा औद्योगिक क्षेत्रात अधिक असते. उद्योगात कृषीपेक्षा अंतर्गत व बाह्य बचती अधिक असतात. जसजसे औद्योगिकीकरण होत जाते तसतसे या प्रमाणाच्या बचती व उद्योगांतर्गत परस्परावलंबित्व संबंध वाढत जातात. औद्योगिकीकरण प्रक्रियेत उद्योजकांना पुढील गुंतवणुकीसाठी वाढावा- देखील उपलब्ध होत असतो.

औद्योगिक क्षेत्रात इतर क्षेत्रांच्या तुलनेत सापेक्षतेने बचत व गुंतवणुकीची सीमांत प्रवृत्ती अधिक असल्यामुळे अर्थव्यवस्थेचा स्वयंचलित सातत्यपूर्ण विकास होण्यास मदत होते. कारण मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूक, उत्पन्नातील गतिमान वाढ आणि औद्योगिक क्षेत्रातील रोजगार वाढ यामुळे अर्थव्यवस्था विकसित होत राहते. याबरोबरच औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेबरोबरच तांत्रिक ज्ञानाचा विकास, औद्योगिक कामाबाबत कौशल्ये व प्रवृत्तीत वाच औद्योगिक व्यवस्थापन आणि आधुनिक समाजासाठी उपयुक्त अशा इतर प्रवृत्तींमध्ये वाव होत गेल्यामुळे कृषी, व्यापार, वितरण व अन्य संबंधित क्षेत्रातील उत्पादकता वाढ होण्यास मदत होते, परिणामतः कृषिक्षेत्रातील श्रमिकांचे औद्योगिक क्षेत्रातील स्थलांतर हे आर्थिक विकासास साहाय्यभूत होते. औद्योगिकीकरण अशा तऱ्हेने सातत्यपूर्ण व मोठ्या प्रमाणावरील आर्थिक विकासापासून वेगळे काढता येणे अशक्य आहे. कारण ते उच्च उत्पादकतेचे व उच्च उत्पन्नाचे कारण व परिणाम दोन्ही आहे. उत्पन्नवाढीबरोबर लोक अन्नापेक्षा उत्पादित (कारखानदारी) वस्तूंवर अधिक खर्च करू लागतात, त्यामुळेच औद्योगिक उत्पादन करणाऱ्या देशांना अशा वस्तूंसाठी वर्धिष्णू बाजारपेठ उपलब्ध होऊन फायदा होऊ लागतो. कृषिक्षेत्रातील घटत्या उत्पादनफलाचा प्रत्यय देणाऱ्या कृषिक्षेत्रातील श्रमिकांना उच्च उत्पादकता असलेल्या औद्योगिक क्षेत्रात आकर्षक नोकऱ्या/संधी उपलब्ध करून देता येते. अशा रीतीने औद्योगिकीकरण अतिरिक्त श्रमशक्तीला सामावून घेण्याचे तसेच उच्च आर्थिक विकासाच्या टप्प्यावरील विस्तारित बाजारपेठेला विविधता मिळवून देण्याचे कार्य करते. अर्थात, याचा अर्थ असा नाही की, अल्पविकसित अर्थव्यवस्थांपुढे प्राथमिक की द्वितीयक यांपैकी कोणते क्षेत्र निवडावे असा प्रश्न असतो. कारण कृषिक्षेत्राचा विकास हा औद्योगिकीकरणासाठी श्रमिकांना अन्नधान्य, कारखान्यांना कच्चा माल व श्रमिक पुरवठा तसेच औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनांना मागणीसाठी आवश्यक असतो. म्हणून अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांचा संतुलित विकास आवश्यक असतो. औद्योगिक क्षेत्राचे उत्पन्न भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नाच्या 28% एवढे आहे.

भारताच्या आर्थिक विकासात उद्योगांची भूमिका पुढीलप्रमाणे आहे -

(1) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ उद्योगधंदे जसजसे विकास पावत आहेत तसतसे रोजगार, उत्पादन व उत्पन्नात वाढ होत आहे. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत संघटित व असंघटित क्षेत्रातील उद्योगांनी राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ घडवून आणली आहे. राष्ट्रीय उत्पन्नात औद्योगिक क्षेत्राचा वाटा सातत्याने वाढत आहे.

(2) रोजगार व रोजगार संधीत वाढ देशात संघटित क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात 19.4 दशलक्ष व खासगी क्षेत्रातील उद्योगात 8.4 दशलक्ष व्यक्तीना रोजगार उपलब्ध झालेला आहे. त्याचप्रमाणे लघुद्योग क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला आहे. परिणामतः देशातील बेकारीची समस्या मोठ्या प्रमाणात दूर झाली आहे. औद्योगिकीकरणामुळे रोजगार संधीत सातत्याने वाढ होत गेलेली दिसून येते.

(3) नैसर्गिक साधनसामग्रीचा अधिकाधिक वापर भारत हा देश नैसर्गिक साधनसामग्रीच्या बाबतीत संपन्न आहे. उद्योगधंदे जसजसे वाढत आहेत तसतसा या नैसर्गिक साधनसामग्रीचा उपयोग वाढत आहे. उद्योगधंद्यांच्या कच्च्या मालाच्या मागणीमुळे देशातील या संपत्तीचा वापर राष्ट्रीय उत्पन्नवाढीसाठी होत आहे.

4) भांडवलनिर्मिती : नियोजनबद्ध विकासात सार्वजनिक क्षेत्राला महत्त्वाची भूमिका बजावायची होती. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली. गुंतवणुकीतील या वाढीमुळे भांडवलनिर्मितीचा दर मोठ्या प्रमाणावर वाढला. खासगी क्षेत्रातही या काळात प्रचंड गुंतवणूक झाली. त्यामुळे भांडवलनिर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली..

(5) शेतीवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत भारत हा शेतीप्रधान देश मानला जातो. देशातील लोकसंख्येचा मोठा भाग शेतीक्षेत्रात गुंतलेला आहे. वाढत जाणाऱ्या लोकसंख्येचा स्थिर शेतजमीन प्रमाणावर अतिरिक्त बोजा पडून दरडोई उत्पादन व उत्पन्न कमी होते. औद्योगिकीकरणामुळे या अतिरिक्त लोकसंख्येला उद्योगधंद्यांमध्ये रोजगार उपलब्ध होऊन शेतीवरील भार कमी होऊ शकला.

(6) निर्यातवाढ : प्राथमिक क्षेत्रातील उत्पादनांच्या मागणीची लवचीकता कर्मा असल्यामुळे त्यांच्या निर्यातीत फारशी वाढ होऊ शकत नाही. भारताची निर्यात विशेषतः शेतमाल व प्राथमिक क्षेत्रातील अन्य उत्पादनांची होती. उद्योगधंद्यांच्या विकासामुळे अभियांत्रिकी उद्योग तसेच हस्तोद्योगातील उत्पादनांची निर्यात वाढू लागली. त्यामुळे एकूण निर्यात वाढून देशाला विदेशी विनिमयप्राप्ती होऊ लागली.

(7) शेतीविकास : शेतीतील उत्पादन जसे ऊस, ताग, कापूस, चहा, लाकूड हे औद्योगिक क्षेत्रात कच्चा माल म्हणून वापरले जाते. औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेत या कच्च्या मालाची मागणी वाढत जाते तसेच औद्योगिक क्षेत्राकडून खते, अवजारे, कीटकनाशके यांचा पुरवठा शेतीला होतो. परिणामतः शेतीक्षेत्राचा विकास औद्योगिक विकासाबरोबर होत जातो.

(8) बाजारपेठेचा विस्तार व विकास उद्योगांच्या स्थापना व विकासाबरोबर लोकांचे उत्पन्न वाढते तसेच अनेकविध वस्तूंचे उत्पादन होत असल्याने बाजारपेठ विस्तारते आणि वाढत्या उत्पन्नामुळे विविध वस्तूंची मागणी वाढत जाते. बाजारपेठेचा अधिकाधिक विकास त्यामुळे होत जातो. उत्पादनवाढीसाठी कच्च्या मालाची मागणी वाढून त्याही बाजारपेठेचा विकास होत जातो. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनामुळे वस्तूंचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादनाची बाजारपेठ विस्तारते. देशांतर्गतच नव्हे तर देशाबाहेरही बाजारपेठ विस्तारते.

(9) आर्थिक स्वावलंबन व आर्थिक स्थैर्य भारत हा शेतीप्रधान देश आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी पूर तर कधी दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींना सतत तोंड द्यावे लागते. त्याचा शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नावरदेखील विपरीत परिणाम होतो व अस्थैर्य निर्माण होते. उद्योगांच्या विकासामुळे अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात स्थैर्य मिळते. कारण त्यातील उत्पादनावर निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम फारसा होत नाही, उद्योगधंदे राष्ट्रीय उत्पन्नात भर टाकत असल्याने स्वयंनिर्भरता व स्वावलंबन तसेच संपत्तीचे संचयनवेखील होत जाते.

(10) संतुलित क्षेत्रीय विकास : देशाचा संतुलित विकास व्हायचा असेल तर सर्व

आर्थिक क्षेत्रांचा विकास होणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्था शेतीक्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. औद्योगिकीकरणामुळे सर्व क्षेत्रांचा समतोल विकास होऊ लागतो. त्यामुळे शेतीवरील अवलंबित्व कमी होऊन निर्माण होणारे आर्थिक अस्थैर्यवेखील कमी होऊ लागते.

**2.2.3 भारताच्या आर्थिक विकासात सेवाक्षेत्राचे योगदान (Contribution of Service Sector to Economic** Development in India)

कोणत्याही अर्थव्यवस्थेत तीन क्षेत्रे असतात प्राथमिक क्षेत्र (शेतीशी संबंधित). द्वितीयक क्षेत्र (औद्योगिक क्षेत्र जे उत्पादन वस्तूंशी संबंधित असते.) आणि तृतीयक क्षेत्र (सेवाक्षेत्र), गेल्या काही दशकांमध्ये भारतात सेवाक्षेत्राचा खूप मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. स्वातंत्र्याच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून

होती. परंतु आता हे जे सेवाक्षेत्र आहे ते आर्थिक विकासाला चालना देत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्राचे योगदान मोठे आहे. हे भारतीय GDP च्या 50 टक्क्यांपेक्षा जास्त (प्राथमिक आणि द्वितीयक क्षेत्र एकत्रितपणे जास्त) आहे. याशिवाय, सेवाक्षेत्रात सर्वाधिक श्रम उत्पादकता आहे. देशाऱ्या आर्थिक विकासात सेवाक्षेत्राचा मोठा वाटा आहे. हे क्षेत्र देशाच्या शिक्षित आणि कुशल तरुणांना रोजगार प्रदान करते आणि देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादना (GDP) मध्ये महत्त्वपूर्ण योगदान देते. याशिवाय, आर्थिक संकटातही सेवाक्षेत्र लोकांना रोजगार देते कारण जेव्हा अर्थव्यवस्था संघर्ष करत असते तेव्हा कुशल कामगारांची गरज असते. म्हणून भारताच्या निव्वळ राष्ट्रीय उत्पावनात तृतीयक क्षेत्राचा वाटा सर्वाधिक आहे. अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रीय रचनेतील तिसरे क्षेत्र म्हणजे सेवाक्षेत्र होय, आर्थिक सेवा म्हणजे एक व्यक्ती किंवा संस्थेने दुसऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला दिलेली सेवा याचा मोबदला दिला किंवा घेतला जातो, सेवाक्षेत्रामध्ये अशा आर्थिक कृतींचा समावेश असतो ज्या वस्तूंचे उत्पादन करत नाहीत, मात्र उत्पादनासाठी व वस्तूंच्या वितरणासाठी मवत करीत असतात, उदा., वाहतूक, व्यापार, दळणवळण, बँकिंग, पोस्ट इत्यादी. सेवाक्षेत्रांमध्ये वस्तूंच्या उत्पादनात सेवाक्षेत्र मदत करीत असले तरी इतर व्यावसायिक, प्रशासकीय, वैयक्तिक सेवा यांचा समावेशसुद्धा सेवाक्षेत्रात बोलो. शिक्षक, बबाल, डॉक्टर, धोबी, हॉटेल, इंटरनेट कॅफे, कॉल सेंटर्स, एटीएम अशा प्रकारच्या इतर सेवा आहेत, सेवाक्षेत्र हे व्यापक क्षेत्र असून यामध्ये आधुनिक व प्रगत सेवांचासुद्धा समावेश होतो. कोणत्याही देशाच्या पायाभूत सुविधा या मूलभूत सेवा आहेत असे म्हणता येईल, विकसनशील राष्ट्रांत अशा मूलभूत सुविधा, सेवा पुरविण्याची जबाबदारी सरकारला पार पाडावी लागते. यामध्ये वाहतूक, प्रशासकीय कार्यालय, पोलीस स्टेशन्स, शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल्स, विमा कंपन्या यांचा समावेश होतो. प्राथमिक, द्वितीयक म्हणजे उद्योग क्षेत्राचा जसजसा विकास होत जातो तसतसे सेवांचा विकासही आवश्यक असतो. किंबहुना औद्योगिक विकासासाठी सेवा पूरक असतात. म्हणून औद्योगिक विकासाबरोबर सेवांचा विकासही आवश्यक असतो.

सेवांचे वर्गीकरण : केंद्रीय सांख्यिकीय संघटनेच्या वर्गीकरणानुसार सेवांचे चार गट पुढीलप्रमाणे

(1) व्यापार सेवा (2) वाहतूक सेवा (3) व्यवसाय सेवा (4) सामुदायिक सेवा.

जागतिक व्यापार संघटनेने प्रसारित केलेल्या माहितीनुसार 2017 मध्ये जागतिक जीडीपीमध्ये सेवाक्षेत्राचा वाटा 65.1% होता. जगातील प्रमुख देशापैकी भारताचा जीडीपीबाबत सातवा क्रमांक होता. मात्र सेवाक्षेत्राचा जीडीपीमध्ये तेरावा क्रमांक होता. एकूण जीडीपीतील भारताचा सेवाक्षेत्राचा वाटा 2017 च्या आकडेवारीनुसार 48.9% होता. संयुक्त राष्ट्राच्या नॅशनल अकाउंट स्टॅटिस्टिक्स डाटा (National Accounts Statistics Data) नुसार 2016 मध्ये जगातील सेवाक्षेत्राचा वृद्धिदर सर्वाधिक भारताचा 7.8% त्यानंतर चीनचा 7.4% होता. CSO च्या 2018 च्या अहवालानुसार सेवाक्षेत्राचा वृद्धिदर 7.9% होता. भारताच्या जीडीपीमध्ये सेवाक्षेत्राचा वाटा 1950-51 मधे 30% होता तो 2016-17 मध्ये 53.77% झाला. यावरून लक्षात येते भारताच्या जीडीपीमधील सेवाक्षेत्राचा वाटा वाढलेला आहे. देशाच्या एकूण जीडीपीच्या वार्षिक वाढीच्या दरापेक्षा सेवाक्षेत्राचा जीडीपी सतत वाढतच राहिलेला आहे. सेवाक्षेत्रापैकी सर्वाधिक वाटा व्यापार सेवांचा राहिलेला आहे. देशातील राज्यांचा विचार करता चंदीगड, दिल्ली, केरळ आणि महाराष्ट्र या चार राज्यांचा क्रमांक सेवाक्षेत्रामध्ये अग्रेसर आहे. रोजगारातील सेवाक्षेत्राचा विचार करता प्राथमिक क्षेत्र रोजगार पुरविणारे मोठे क्षेत्र असले तरी त्यानंतर सेवाक्षेत्राचा क्रमांक लागतो. सेवाक्षेत्र आणि परकीय गुंतवणूक

भारतात आलेल्या परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीत सर्वाधिक हिस्सा असलेली पहिली पाच

**सेवाक्षेत्रे पुढीलप्रमाणे** -

1. वित्तीय व बिगर-वित्तीय सेवा 18%

2. सॉफ्टवेअर सेवा - 8%

3. दूरसंचार सेवा - 8%

4. बांधकाम विकास - 7%

5. व्यापार - 5% सर्वाधिक गुंतवणूक मॉरिशस या देशाकडून झाली तर त्यासोबत सिंगापूर, युनायटेड किंगडम, यूएसए व जपान या देशांचा क्रमांक लागतो. सेवाक्षेत्र भारताच्या आर्थिक विकासात पुढीलप्रमाणे महत्त्वाची भूमिका बजावते.

(1) स्थूल देशांतर्गत उत्पादनात योगदान (GDP) : भारताच्या जीडीपीमध्ये

सेवाक्षेत्राचे योगदान सर्वांत मोठे आहे, जे एकूण जीडीपीच्या जवळपास 55-60% आहे. हे आर्थिक वाढीस चालना देण्यासाठी त्याची महत्त्वपूर्ण भूमिका दर्शविते. (2) रोजगारनिर्मिती : सेवाक्षेत्र हे भारतातील रोजगाराचे प्रमुख स्रोत आहे, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. हे आय.टी., वित्त, आरोग्यसेवा, शिक्षण, पर्यटन आणि बरेच काही यांसारख्या विविध विभागांमध्ये रोजगाराच्या संधी प्रदान करते.

(3) परकीय चलन प्राप्ती : भारतातील अनेक सेवा जसे की, आउटसोर्सिंग,

बिझनेस प्रोसेस आउटसोर्सिंग (BPO) आणि पर्यटन, परकीय चलनाच्या उत्पन्नामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देतात. यामुळे भारताचे व्यवहारतोल संतुलन आणि एकूणच आर्थिक स्थिरता मजबूत होण्यास मदत होते.

(4) औद्योगिक विकासात योगदान सेवाक्षेत्राच्या वाढीचा इतर क्षेत्रांवर

विशेषतः औद्योगिक क्षेत्रावर परिणाम होतो. सेवाक्षेत्राला वस्तू आणि सेवा पुरविणाऱ्या उद्योगांकडून मागणी वाढली ज्यामुळे पुढील आर्थिक विकास आणि औद्योगिक वाढीला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली.

(5) तंत्रज्ञानविषयक प्रगती सेवाक्षेत्र भारतातील तांत्रिक प्रगतीला चालना

देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. संपूर्ण आर्थिक आधुनिकीकरणाला हातभार लावत सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, इनोव्हेशन आणि डिजिटल सेवांसाठी देश जागतिक केंद्र म्हणून उदयास आला आहे.

(6) उत्पन्ननिर्मिती आणि राहणीमानाचा दर्जा : सेवाक्षेत्र उच्च उत्पन्नासाठी संधी प्रदान करते, विशेषतः वित्त, आय.टी. आणि व्यावसायिक सेवा यांसारख्या विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. यामुळे राहणीमानात सुधारणा होते आणि गरिबी कमी होण्यास हातभार लागतो.

(7) नागरिकीकरण आणि पायाभूत सुविधांचा विकास : सेवाक्षेत्राची वाढ अनेकदा शहरी भागात केंद्रित असते, ज्यामुळे जलद शहरीकरण होते आणि कार्यालयीन  जागा, वाहतूक नेटवर्क आणि दळणवळण प्रणाली यांसारख्या पायाभूत सुविधांचा विकास होतो.

(8) जागतिक स्पर्धात्मकता: भारताच्या सेवाक्षेत्राला त्याच्या गुणवत्तेसाठी आणि किफायतशीरतेसाठी जागतिक मान्यता मिळविली आहे. हे जागतिक बाजारपेठेत भारताची स्पर्धात्मकता वाढविते आणि परकीय गुंतवणूक आकर्षित करते, आर्थिक वाढीला चालना देते.

(9) अर्थव्यवस्थेचे विविधीकरण: सेवाक्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेला वैविध्यता प्रदान करते, शेती आणि उत्पादन यांसारख्या पारंपरिक क्षेत्रांवरील अवलंबित्व कमी करते. या वैविध्यतेमुळे अर्थव्यवस्थेची बाह्य धक्क्यांसाठी लवचीकता वाढते आणि शाश्वत विकासाला चालना मिळते.


(10) शासकीय महसूल सेवाक्षेत्र आयकर, कॉर्पोरेट कर, सेवाकर आणि अप्रत्यक्ष करांसह करांद्वारे सरकारी महसुलात महत्त्वपूर्ण योगदान देते. हा महसूल सरकारी कार्यक्रमांना वित्तपुरवठा करण्यासाठी आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आवश्यक आहे.

सेवाक्षेत्र हे भारताच्या आर्थिक विकासाचे प्रमुख क्षेत्र आहे. जीडीपी वाढ, रोजगार- निर्मिती, तांत्रिक प्रगती, परकीय चलनाची कमाई आणि जीवनमानात एकूणच सुधारणा यामध्ये योगदान देते. दीर्घकालीन भारताची आर्थिक प्रगती टिकवून ठेवण्यासाठी तिची निरंतर वाढ आणि नवकल्पना महत्त्वपूर्ण आहेत.

## २.४ शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र यांच्यातील परस्परावलंबन :

(Interdependence between Agriculture, Industry and Service Sectors)

शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र यांच्यातील परस्परावलंबन पुढीलप्रमाणे :




१) शेती आणि उद्योग क्षेत्रांमधील परस्परावलंबन :

शेती क्षेत्र अनेक आर्थिक व्यवहारांसाठी आधार प्रदान करते कारण त्यात सर्वात मूलभूत स्तरावरील म्हणजेच नैसर्गिक संसाधनांच्या वापराद्वारे (exploitation) होणाऱ्या उत्पादनाचा (उदा. शेती, फलोत्पादन, मत्स्यपालन, वनीकरण,

खाणकाम इत्यादी.) समावेश होतो. उद्योगांना त्यांच्या उत्पादन प्रक्रियेसाठी शेती क्षेत्रातील कच्च्या मालाक आवश्यकता असते, जसे की कापूस, ऊस आणि तेलबिया. हा कच्चा माल विविध उत्पादनांच्या निर्मितीसाठी आदान म्हणून वापरला जातो. प्रक्रियेसाठी कच्चा माल मिळविण्यासाठी उद्योग क्षेत्र शेती क्षेत्रावर अवलंबूर असते. शेती क्षेत्राच्या वृद्धीचा उद्योग क्षेत्राच्या विकासाशी जवळचा संबंध आहे. उद्योग क्षेत्र शेती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते. त्यामुळे उद्योगाच्या उत्पादनांना असलेल्या मागणीत वाढ होऊन आर्थिक विकासाला चालना मिळते. जरी भारत स्वातंत्र्यानंतर काहीवेळा अन्नधान्य आयात करत असला, तरी तो शेती-आधारित उद्योगांच्या उत्पादनांची निर्यात करत आहे, त्याद्वारे, देशाला केवळ अन आयातीसाठीच नव्हे तर उद्योगासाठी आवश्यक भांडवली वस्तूंचा समावेश असलेल्या इतर आयातीसाठी देखील मदत होत आहे. शेती क्षेत्र त्यांचे उत्पादन किंवा वस्तू खरेदी करण्यासाठी उद्योग क्षेत्रावर अवलंबून असते, जेणेकरुन त्यावर प्रक्रिया करून तयार वस्तू निर्माण करता येतील. उद्योग क्षेत्राचे एक मोठे योगदान म्हणजे ते शेतीला आधुनिक आदानांचा पुरवठा करते. आदाने ही खते, कीटकनाशके, यंत्रे इत्यादी स्वरूपात असतात. या आदानांमुळे शेती क्षेत्राची उत्पादकता वाढण्यास मदत होते. मूल्यवर्धी करण्यासाठी

उद्योग शेती उत्पादनांवर प्रक्रिया करतात. उदाहरणार्थ, साखर कारखाने साखरेचे उत्पादन करण्यासाठी उसावर प्रक्रिया करतात आणि तेल गिरण्या तेल तयार करण्यासाठी तेलबियांवर प्रक्रिया करतात. या प्रक्रियेमुळे शेती उत्पादनांची गुणवत्ता वाढते आणि ते वापरासाठी अधिक योग्य बनते.

शेती आणि उद्योग यांचे परस्परावलंबन या दोन्ही क्षेत्रांच्या विकासास मदत करते. या आंतरनिर्भरतेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे एकाची उत्पादने दुसऱ्यासाठी महत्त्वाची आदाने म्हणून काम करतात. एका क्षेत्राची वाढ म्हणजे दुसऱ्या क्षेत्रासाठी आदानांचा पुरेसा पुरवठा होय.

२) उद्योग आणि सेवा क्षेत्रांमधील परस्परावलंबन :

उद्योग क्षेत्र सेवा क्षेत्राच्या मदतीने उत्पादन कार्ये करते. शेती क्षेत्रातून उत्पादनाच्या ठिकाणी कच्च्या मालाच्या वाहतुकीसाठी वाहतूक सेवा आवश्यक आहेत. कारखान्यात काम करणाऱ्या व्यक्तीची कौशल्ये आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी शैक्षणिक व आरोग्य सेवांसाठी ते सेवा क्षेत्रावर अवलंबून असते. उद्योग क्षेत्र त्यांचे उत्पादन ग्राहकांना वितरित करण्यासाठी सेवा क्षेत्रावर अवलंबून असते. सेवा क्षेत्र विक्रीसाठी तयार माल पुरवण्यासाठी उद्योग क्षेत्रावर अवलंबून असते. सेवा क्षेत्र औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन प्रक्रियेस आधार देते. यामध्ये वाहतूक, साठवण, विपणन आणि उत्पादनांची विक्री समाविष्ट आहे. इतर सेवांमध्ये बँक व्यवसाय आणि दळणवळण यांचा समावेश होतो. ही क्षेत्रे उत्पादनास मदत करण्यासाठी आवश्यक आहेत आणि स्वतःच त्यातून त्यांचे भरणपोषण (sustenance) करतात.

सेवा क्षेत्र संगणक, प्रिंटर यासारख्या औद्योगिक उत्पादनांसाठी उद्योग क्षेत्रावर अवलंबून असते. तसेच, सेवा क्षेत्रातील लोक उपभोग्य उत्पादने खरेदी करतात जी उद्योग क्षेत्रात उत्पादित केली जातात. यात काही शंका नाही की, पायाभूत सुविधांचा समावेश असलेल्या अनेक बाबी शेती क्षेत्र तसेच उद्योग क्षेत्राला सेवा देतात परंतु त्या प्रामुख्याने उद्योग क्षेत्राद्वारे पुरविल्या जातात. वाहतूक, वित्तीय संस्था, आरोग्य सेवा, शैक्षणिक आणि संशोधन संस्था या सर्वांचे अस्तित्व मुख्यत्वे उद्योग क्षेत्राकडून पुरवल्या जाणाऱ्या सुविधांवर अवलंबून आहे.

३) शेती आणि सेवा क्षेत्रांमधील परस्परावलंबन :

शेती क्षेत्र त्यांचे उत्पादन उद्योग क्षेत्र व ग्राहक या दोघांना वितरित करण्यासाठी आणि विपणन करण्यासाठी सेवा क्षेत्रावर अवलंबून असते. सेवा क्षेत्र त्यांच्या सेवा बापरण्यासाठी आणि प्राप्तीचा स्त्रोत पुरविण्यासाठी शेती क्षेत्रावर अवलंबून असते. शेती क्षेत्र हे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सेबांसाठी सेवा क्षेत्रावर अवलंबून असते. शेती क्षेत्र विविध सेवा क्षेत्रातील उपक्रमांमध्ये काम करणाऱ्या शहरी लोकांना अन्न उत्पादनांचा (food products) पुरवठा करते. त्याचप्रमाणे, सेवा क्षेत्र शेती क्षेत्राला व्यापार, बँक व्यवसाय आणि इतर वित्तीय सेवा यासारख्या विविध सेवांचा पुरवठा करते.